Peer Reviewed Refereed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{Bi-Monthly} Volume – XIII Issue – III May - June 2024

# चिकित्सक विचार क्षमता

सहा. प्रा. ज्योती विजय रणदिवे
संशोधक
अध्यापक महाविदयालय, वडगाव-मावळ

डॉ.शिवाजी देसाई
मार्गदर्शक
श्रीमती काशीबाई नवले शिक्षणशास्त्र महाविदयालय,
लोणावळा

## १. प्रस्तावना ः

मानवी जीवन हे विविध अंगानी नटलेले आहे. नेहमी आपण या विविध अंगाचा परिचय करून घेण्याचा प्रयत्न करीत असतो. आपण वंश, शरीर, सौदर्य, नीती, मन, समाज, तर्क, तत्वज्ञान आणि अर्थ अशा कितीतरी अंगोपांगांचा विचारपूर्वक अभ्यास करण्याचा प्रयत्नात असतो आणि यातून मानवी जीवन साकार होत असते. मानवी जीवन विज्ञानामुळे सुखी समृध्द झाले आहे. हे जेवढे खरे तेवढेच ते संस्कृतीमुळे नीटनेटके व सुसंस्कृत बनले आहे .

शिक्षण क्षेत्रात सर्वात महत्वाचा घटक म्हणजे विद्यार्थी किंवा अध्ययन कर्ता होय. विदयार्थ्यांच्या व्यक्तिमत्वाचा विकास करणे हेच शिक्षणाचे उद्दिष्ट आहे. व्यक्तिमत्व हा शब्द आपण दुस-या व्यक्तीचे वर्णन करण्यासाठी वापरतो. सर्व साधारणपणे मनुष्य व्यक्तिमत्वाचा विचार करताना व्यक्तिची शरीरयष्टी आणि शारीरिक जडण घडण लक्षात घेत असतो. परंतु व्यक्तिमत्वाच्या मानसशास्त्रीय दृष्टीकोनानुसार हे वर्णन केवळ एकांगी झाले. महात्मा गांधीसारखे लोक पोषाखाच्या बाबतीत कधीच चोखंदळ नव्हते. पण तरीही त्यांच्या व्यक्तिमत्वाचा प्रभाव हजारो लोकांवर पडत असतो. त्याच प्रमाणे साधा भगवा पोषाख करणारे स्वामी विवेकानंद अमेरिकेच्या लोकांवर आपली छाप पाडतात. याचा अर्थ स्पष्ट होतो की व्यक्तिमत्वाचा प्रभाव पाडण्यासाठी बाहय नीटनेटकेपणा अत्यावश्यक आहे असे म्हणता येत नाही. व्यक्तिची स्वःताची अशी काही वैशिष्टये असतात की त्यांचा प्रभाव त्यांच्या बोलण्यातून व वागण्यातून प्रकट होत असतो. या सर्व गोष्टीवरून लक्षात येते की व्यक्तिच्या बाहयांगाबरोबर तिच्या अंतरंगाचा विचार व्यक्तिमत्व या संज्ञेत करणे आवश्यक आहे.

Global Online Electronic International Interdicipilinary Research Journal's licensed Based on a work at http://www.goeiirj.com

बालकाची वैशिष्टये कोणती? बालक स्वतः कडे कसे पाहते? त्याच्याकडे असणा-या क्षमता कोणत्या? ते समाजाकडे कसे पाहते? ते ज्या घरी वाढते त्या परिसरातून शेजारच्या समाजाकडून ते काय शिकते? स्वतःची तुलना ते इतरांशी कसे करते? स्वतःकडे असणा-या व नसणा-या क्षमतांबद्दल त्याला काय वाटते? याचा विचार करावा लागतो. बालकाच्या आशा आकांक्षा कोणत्या? व त्यांच्या पूर्ततेसाठी ते कसे प्रयत्नशील राहते? तसेच त्याचा आपल्या जीवनाकडे पाहण्याचा दृष्टिकोन कसा आहे व कसा असायला हवा याचे भान विद्यार्थ्याला असायला हवे. आजचा बालक हा उद्याचा युवक आहे. बदलत्या जगातील त्याच्या आशाआकांक्षा आणि मागण्या पूर्ण करणारा शिक्षक हवा. उद्याचे भविष्य उज्ज्वल घडविण्यासाठी, शिक्षकाला विद्यार्थ्यांना मार्गदर्शन व समुपदेशन करता आले पाहिजे. मानवी व्यक्तीमत्त्वाचे महत्वाचे वैशिष्टय

Peer Reviewed Refereed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{Bi-Monthly} Volume – XIII Issue – III May - June 2024

म्हणजे व्यक्तीला तिच्याजवळ असलेली 'स्व-संकल्पना'. मी कोण आहे? माझी वैशिष्टये काय आहे? माझ्या बलस्थाने व मर्यादा कोणत्या हे सर्व जाणून घेण्याचा व वैयक्तिक पातळीवर स्वतःला ओळखण्याचा प्रयत्न करते, तर कधी इतरांकडून जाणून घेण्याचा प्रयत्न केला जातो. लोक मला चांगले म्हणतात की नावे ठेवतात? मित्रमैत्रिणींमधून मला स्विकारतात की टाळतात इ. प्रत्येकाची स्वतः विषयाची एक कल्पना असते.

शिक्षण देण्याचे व विद्यार्थ्यांचा सर्वांगिण विकास करण्याचे काम शाळा ही संस्था करते. त्या संस्थेतील शैक्षणिक वातावरण, तेथील उपलब्ध सोयी सुविधा या घटकांचा प्रभाव विद्यार्थ्यांच्या मनावर, विकासावर घडत असतो. विद्यार्थी स्वतःबद्दल कसा विचार करतो. त्याची वागणूक कशी असते. स्व-संकल्पना म्हणजेच अनुभवाचा मान्यता प्राप्त भाग होय. मी कोण आहे? मी काय करू शकतो? याची जाणीव स्व-संकल्पनेत अंर्तभूत होते. विद्यार्थी प्रत्येक अनुभव स्व-संकल्पनेशी ताडून पाहतो. स्व प्रतिमांचे सातत्य त्यातून टिकवित असतो. 'आदर्श स्व' आणि 'वास्तव स्व' हे जितके जवळ येतील व एकरूप होतील तितकाच विद्यार्थी समाधानी व आनंदी असू शकतो. विद्यार्थ्यांची स्व-संकल्पना सुधारण्यासाठी त्याला वेळीवेळी मित्र परिवार, पालक, शिक्षक, आणि शाळांनी पुरक वातावरणनिर्मिती केली पाहिजे.

**विचारप्रक्रिया ः**

मानव हा विचारशील प्राणी आहे. मानवाला विचार करण्याची शक्ती निसर्गतःच प्राप्त आहे. विचार, तर्क, समस्या निराकरण अशा प्रमुख वैशिष्टंयामुळे मानव इतर प्राण्यापेक्षा भिन्न विशेष आहे. उत्तम कविता करणे, कथा लिहणे, चित्र रेखाटणे, एखादया यंत्राची निर्मिती करणे ही सर्व विचारांची निष्पती आहे. मानवाला विचार ही उच्च मानसिक प्रक्रिया आहे. विचार हा बोधात्मक मनोव्यापार परिस्थितीशी जुळवून घेण्यासाठी चालू असतो. परिस्थितीशी जुळवून घेणे आणि पूर्वा नुभवांशी जुळवाजुळव करणे या मानसिक क्रिया सतत चालू असतात. म्हणजेच विचार हा मनोव्यापार जागृत अवस्थेत सतत चालू असतो. विचार हा निरनिराळया स्तरांवर चालू असतो. अगदी आज फिरायला कुठे जावे त्या लहान गोष्टी पासून आंतरराष्ट्रीय स्तरावर भारताचे स्थान कसे उंचवावे येथ पर्यत विचाराचे स्तर असतात.

**विचारप्रक्रियेच्या व्याख्याः**

१. विचारप्रक्रिया ही एक मानसिक कृती असून ती बोधात्मक पैलूंशी संबंधित असते — रॉस १९५१

२. विचारप्रक्रिया म्हणजे समस्या निराकरणार्थ केलेले वर्तन किंवा विचारप्रक्रिया म्हणजे समस्या निराकरणाचे सूचक वर्तन - मोहसिन १९६७


३. समस्येचे विश्लेषण करून ती सोडविण्याची योजना तयार करणे म्हणजे विचारप्रक्रिया होय.

❖ **विचारांचे स्तरः**

विचाराचे प्रमूख दोन स्तर आहे.

१. अवबोधात्मक स्तर

२. संबोधात्मक स्तर




**१. अवबोधात्मक स्तर ः**

एखादा उद्दिपक समोर असताना त्याचे संवेदन ज्ञानेद्रियांना होते. त्या संवेदनाला अर्थ लावला जातो आणि अवबोध तयार होतो. या अवबोधाच्या सहाय्याने जो विचार केला जातो त्या विचाराच्या स्तराला अवबोधत्मक विचार असे म्हणतात. उदा. कुत्रा समोर आल्यानंतर त्याचे दिसणे त्याचे भुंकणे यांचे संवेदन डोळयांना कानांना होते हा कुत्रा आहे याचा अवबोधही त्याच वेळेला होतो.

**२. संबोधत्माक विचारः**

उद्दिपक समोर नसतानाही विचारप्रक्रिया सुरू असते असा विचार हा संबोधात्मक स्तरावर सुरू असतो. या स्तरावरील विचारासाठीही काही साधनाची गरज असते. निरनिराळे अवबोध संकल्पना, प्रतिमा, कल्पना, भाषा ही विचारांची साधने आहेत किंवा विचारांची प्रतीके आहेत. संबोधात्मक विचारात विमर्षण समस्या निराकरण चिकित्सक विचार (Critical thinking) आणि सृजनशील विचार यांचा समावेश होतो.

**चिकित्सक विचारः (Critical thinking)**

एखादी वस्तू, घटना, तत्व, संकल्पना यांचे सर्वागाने निरिक्षण करणे, विश्लेषण करणे परीक्षण करून एखादया गोष्टीचे मूल्यमापन करणे त्या घटनेची योग्यायोग्यता ठरविणे दोन गोष्टीचे तुलनात्मक परिक्षण करणे. या सर्व बांबीचा समावेश चिकित्सक विचारात होतो. चिकित्सक विचारात योग्यायोग्यतेची प्रमाणके व्यक्ति स्वतःच ठरवत असते. उदा. वर्गातल्या एखादया हुशार विदयार्थ्याला चाचणी परिक्षेत कमी गुण मिळाले तर या विदयार्थ्याला कमी गुण का मिळाले? अभ्यासातील त्याची अभिरूची कमी झाली का? शाळेतील त्याची हजेरी नियमित आहे का? अध्यापन पध्दतीत काही कमतरता आहे का? या मुलाची संगत कशी आहे. त्याच्या घरातील परिस्थितीमध्ये काही वेगळी घटना घडली आहे का? अशा सर्व दृष्टीनी घटनेचा विचार करावा लागतो. आणि या सर्व विश्लेषणानंतर घटनेची कारणमिमांसा करणे घटनेमध्ये मुलाचे वर्तन दोषयुक्त आहे की नाही याचा निर्णय करणे यासाठी योग्यायोग्यतेचे निकष आपणच ठरविणे महत्वाचे असते.

या विचारप्रक्रियेमध्ये एखादी वस्तू, घटना, व्यक्ति, प्रसंग, नाव, सूत्र यांचा विविध अंगांनी विचारा केला जातो. त्यामुळे ही विचारप्रक्रिया आव्हानात्मक असते. कारण विविधांगी विचार करणे वाटते तितके सोपे नाही. ही अत्यंत शिस्तीत

केली जाणारी विचारप्रक्रिया असून त्यामध्ये व्यक्तिची संकल्पना निर्मितीची क्षमता विश्लेषण आणि अन्वयार्थ लावण्याची क्षमता मूल्यमापन क्षमता अशा मानसिक क्षमतांचा समावेश होतो. उत्तम किंवा योग्य निर्णय घेण्यासाठी ही विचारप्रक्रिया उपयुक्त ठरते. अध्ययनार्थ्याच्या अपयशाची कारणमिमांसा करताना शाळा, कुटुंब, शिक्षक, अभ्यासक्रम, वातावरण, मित्र शाळेतील मार्गदर्शन, अध्ययनार्थ्याची बुध्दी व अभिरूची अशा विविध पैलूंबाबत विचार करून नंतर अपयशाची कारणे शोधण्यासाठी केलेल्या विचाराला चिकित्सक विचार म्हणतात.

व्यक्तिमत्व विकासातील अनेक कौशल्य न केवळ करिअर मध्ये पुढे जाण्यास मदत करतात तर वैयक्तिक जीवनातही तितकेच फायदेशीर ठरतात. असेच एक कौशल्य जे करिअर करताना कामाच्या ठिकाणी फायदेशीर ठरते ते म्हणजे चिकित्सक विचार (Critical thinking). कोणत्याही गोष्टीचा गाभिर्याने विचार करणे. पण याचा पारिभाषिक अर्थ आहे कोणत्याही गोष्टीचा सखोल व सर्व बांजूनी केलेला विचार. चिकित्सक विचार(Critical thinking) म्हणजे कोणत्याही गोष्टीचे तार्किक व स्पष्ट विचार करण्याची क्षमता असणे. कोणत्याही संकल्पनेमधील तर्क पाहणे आणि समजून घेणे. ठराविक साचेबध्द विचार न करता विचारशक्तीला आव्हान करत राहणे हे अपेक्षित असते. जे पूर्वग्रह मांडले जात आहे त्यावर आधि विचार करणे गरजेचे असते. चिकित्सक विचार (Critical thinking) एक अशी विचारप्रक्रिया आहे ज्यात उपलब्ध असलेले निष्कर्ष किंवा केले जाणारे प्रतिवाद सहज स्विकारले जात नाही तर त्यावर प्रतिप्रश्न केले जातात. प्रसिध्द विचारवंत अर्वट आईनस्टाईन यांनी म्हटले आहे की, आपण ज्या वैचारिक स्थितीत समस्या तयार केलेली असते. त्याच स्थितीत ती समस्या कधीच सोडवू शकत नाही.

आजच्या जीवनामध्ये सामाजिक, राजकिय, आर्थिक, सांस्कृतिक परिस्थितीमध्ये झपाटयाने बदल होत आहेत. या बदलामुळे विदयार्थी गोंधळून गेलेला आहे. पालकांच्या आणि शिक्षकांच्या मोठया अपेक्षांच्या ओझ्याखाली विदयार्थी दडपला गेला आहे. त्यामुळे स्वतःला समजून घेण्याची क्षमता विकसित होण्यास त्यास अडसर निर्माण होत आहे. व्यक्तिचा सर्वागिण विकास करणे हे शिक्षणाचे अंतिम उद्दिष्ट मानले जाते. त्या सर्वागिण विकासामध्ये मानसिक क्षमतांचा जास्तीत जास्त उपयोग करून शिक्षण अधिकाधिक जीवनकेद्रिंत करून विदयार्थ्याच्या व्यक्तिमत्वाचा विकास साधता येतो. व्यक्ति विकास हा चारित्र निर्मितीशी निगडित असतो. चारित्र्याची उत्तमप्रकारे जडणघडण होण्यासाठी मानवाला महत्वपूर्ण जीवनकौशल्याची आवश्यकता आहे म्हणूनच जीवन कौशल्य विकास शिक्षणातून होणे गरजेचे आहे. यास मानसशास्त्रीय कौशल्य म्हणूनही ओळखले जाते. जागतिक आरोग्य संघटनेने १९९९ मध्ये पुढील १० जीवनकौशल्यांचा विचार केला आहे

१.स्व जाणीव २. समानुभूती ३.समस्या निराकरण ४. निर्णयक्षमता ५.परिणामकारक संप्रेषण ६.व्यक्ति व्यक्ति मधील सहसंबध ७. सर्जनशील विचार **८.चिकित्सक विचार** ९. भावनांचे समायोजन १०.ताणतणावाचे समायोजन

चिकित्सक विचार हया घटकाचा दहा जीवन कौशल्यामध्ये समावेश आहे. चिकित्सक विचार म्हणजे स्पष्टपणे आणि तर्कशुध्दपणे विचार करण्याची क्षमता तसेच कल्पंनामधील तार्किक संबंध समजून घेणे होय. चिकित्सक विचारामूळे दैंनदिन जीवनात येणा-या अडचणी व समस्या यांवर विचारपूर्वक निर्णय घेऊन त्यामधून योग्य यशस्वी मार्ग काढता येतो. सभोवतालच्या परिस्थितीची जाणीव करून योग्य निर्णय घेण्याची क्षमता विकसित होते. एखादी कृती विचार हे पारंपारिकपणे

मांडण्यापेक्षा त्यामध्ये नावीन्य सोपेपणा उत्साह निर्माण करून ते वेगळेपणाने मांडण्यास चिकित्सक विचारांमूळे सहज शकय होते.

❖ **चिकित्सक विचार प्रक्रियेचे महत्वः**

१. विदयार्थी ज्ञानार्थी न बनता चिकित्सक वृत्ती, तर्क व अनुमानशक्ती विकसित होते.

२. विदयार्थ्याला योग्य दिशेने विचार करण्याची सवय लागते.

३. कोणत्याही गोष्टीचा चिकित्सक विचार करण्याची सवय लागते.

४. पूर्वग्रह आणि भावना यांचा विचारांवर प्रभाव पडू न देता विवेकपूर्ण निर्णय घेण्याची क्षमता विकसित होते.

५. स्वतंत्रपणे विचार करण्याचीसवय लागते.

६. चिकित्सक विचारामुळे तुलना करणे, सवंध शोधणे, पृथक्करण करणे, तर्क करणे अशा कृती करण्याची संधी विदयार्थ्यांना मिळते.

❖ **चिकित्सक विचार क्षमतेचे घटकः**

१. व्याख्या ः समस्या समजून घेण्याची आणि ओळखण्याची क्षमता म्हणजे व्याख्या होय.

२. विश्लेषणः चलांचे परीक्षण संघटित वर्गीकरण फरक आणि प्राधान्य क्षमता म्हणजे विश्लेषण होय.

३. मूल्यमापनः निष्कर्षाचे समर्थन करण्यासाठी आवश्यक असलेल्या माहितीच्या स्त्रोतांची विश्वासार्हता महत्व आणि लागूपणाचे मूल्यमापन करण्याची क्षमता म्हणजे मूल्यमापन होय.

४. अनुमान ः पुराव्याच्या आधारे गृहितके तयार करण्याची किंवा निष्कर्ष काढण्याची क्षमता म्हणजे अनुमान होय.

५. स्पष्टीकरणः निष्कर्षापर्यंत पोहचलेल्या गृहितकांचे स्पष्टीकरण देण्याची क्षमता म्हणजे स्पष्टीकरण होय.

६. स्व-नियमन ः आत्मपरिक्षण आणि स्वतःची सुधारणा करण्याची क्षमता म्हणजे स्व-नियमन होय.

**संदर्भसूचीः**

१. जगताप,ह.ना. (२०१२) शैक्षणिक मनसशास्त्र.पुणे.प्रोफिशन्ट पब्लिकेशन हाऊस.

२. भिंताडे, वि. रा. (१९९९) शैक्षणिक संशोधन पध्दती ,पुणे -३०, नित्यनुतन प्रकाशन.

३. मुळे, रा. रा. आणि उमाठे वि.तु(१९९८) शैक्षणिक संशोधनाची मुलत्तवे .

४. दांडेकर, वा.ना.(१९९५) ***शैक्षणिक व प्रायोगिक मानसशास्त्र , पुणे ,*** श्री विदया प्रकाशन ५.नानकर, प्र. शिराडे, एस (जूलै २००७) ***सुबोध शैक्षणिक व प्रायोगिक मानसशास्त्र, पुणे,*** नित्यनूतन प्रकाशन

६. मोरे, लता.(सप्टेंबर २०१०) ***शिक्षणाचे मानसशास्त्रीय अधिष्ठान,*** नागपूर, पिंपळापुरे ॲण्ड कं.पब्लिशर्स, .

7. http://www.oxforddictionaries.com/definition/english/effectivenes

8. https://www.worldwidejournals.com/indian-journal-of-applied-research-(IJAR)/fileview/February_2017_1485954417__166.pdf

9. https://www.educatorstechnology.com/2014/04/the-8-elements-of-critical-thinking.html
10. https://marathivishwakosh.org/1803/
11. https://marathivishwakosh.org/3218/
12. https://louisville.edu/ideastoaction/about/criticalthinking/what
13. https://www.researchgate.net/publication/271880888_Assessment_of_the _High_School_Students'_Critical_Thinking_Skills
14. https://www.rasmussen.edu/student-experience/college-life/critical-thinking-skills-to-master-now/
15. https://getd.libs.uga.edu/pdfs/purvis_carol_a_200912_edd.pdf

GoEIIRJ